आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२ नोव्हेंबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- देशाचा सर्वात वजनदार दूरसंवाद उपग्रह श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून आज संध्याकाळी अवकाशात झेपावणार

- कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूरमधे शासकीय महापूजा संपन्न

- नाशिक आणि अमरावती या दोन जिल्ह्यांना प्रत्येकी एक ‘सी-ट्रिपल आयटी’ केंद्र मिळणार

**आणि**

- महिला क्रिकेट विश्वचषक विजेतेपदासाठी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अंतिम लढत / पावसामुळे सामना सुरु व्हायला विलंब

**<><><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था आज संध्याकाळी सीएमएस-03 हा देशाचा सर्वात वजनदार दूरसंवाद उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. आंध्र प्रदेशात श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून संध्याकाळी ५ वाजून २६ मिनिटांनी या उपग्रहाचं प्रक्षेपण होईल. सीएमएस-03 हा लष्कराचा मल्टी-बँड दूरसंवाद उपग्रह असून, त्याला जीसॅट--7 आर असंही म्हणतात. एलव्हीएम-3 या देशातल्या सर्वात शक्तिशाली उपग्रह प्रक्षेपकाच्या साहाय्याने तो अवकाशात सोडला जाईल. ४ किलो पर्यंत वजन वाहून नेण्याची त्याची क्षमता आहे. या प्रक्षेपकानं चांद्रयान-३ सारख्या मोहिमा यशस्वीपणे पार पडल्या आहेत. सीएमएस-03 हा मल्टी-बँड दूरसंवाद उपग्रह भारतीय भूभागासह लगतच्या महासागराच्या विस्तृत क्षेत्रात सेवा देईल, असं इस्रोनं आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. सीएमएस-03 उपग्रह भारतीय नौदलाच्या संपर्क यंत्रणेत लक्षणीय सुधारणा घडवेल. तसंच तो उच्च-क्षमतेची बँडविड्थ देखील प्रदान करेल, त्यामुळे दुर्गम भागांशी डिजिटल माध्यमातून संपर्क साधता येईल. सामाजिक संस्थांसाठी आणि धोरणात्मक आखणीसाठी तो उपयोगी ठरेल असं इस्रोनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली मध्ये उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५ चं उद्घाटन करतील. या कार्यक्रमात ते देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना निधीचा प्रारंभ करतील.

शिक्षण तज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकार मधल्या ३ हजारापेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणं, पॅनेल चर्चा, सादरीकरणं आणि तंत्रज्ञान विषयक प्रदर्शनं आयोजित केली जातील. देशाची विज्ञान आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे योग्य व्यासपीठ ठरेल.

**<><><><><>**

कार्तिकी एकादशीनिमित्त आज विठ्ठल मंदिरांमधे गर्दी झाली आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केल्या जाणाऱ्या या उत्सवाबद्दल अधिक माहिती ऐकूया

---- VC- - -

*(कार्तिक शुद्ध एकादशी हा चातुर्मासाचा समारोप मानला जातो. आषाढी एकादशीपासून सुरु केलेली अनेक व्रत वैकल्यं आणि उपक्रमांचं उद्यापन केलं जातं. आषाढ शुद्ध एकादशीला निद्रधीन झालेले देव आज कार्तिक एकादशीला जागे होतात अशी लोकधारणा आहे. आषाढीप्रमाणेच कार्तिकी एकादशीला देखील पंढरपूरची वारी केली जाते. कार्तिकी एकादशी निमित्त आज पहाटे पंढरपूर इथं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विठ्ठलाची शासकीय महापूजा सपत्नीक केली. राज्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांवरचं संकट दूर करावं असं साकडं शिंदे यांनी विठुरायाला घातलं. यावेळी मानाचे वारकरी म्हणून नांदेड जिल्ह्यातले रामराव आणि सुशिलाबाई वालेगावकर या दांपत्याला विठ्ठलाची महापूजा करण्याचा मान मिळाला. विशेष म्हणजे यंदा जिल्हा परिषद शाळेतल्या दोन विद्यार्थ्यांनाही पूजा करण्याचा मान देण्यात आला. मानाच्या वारकऱ्यांना राज्य परिवहन-एसटीचा मोफत पास आता एक वर्षा ऐवजी कायमस्वरूपी देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. एकादशीमुळे पंढरपूरात पहाटेच लाखो भाविकांनी चंद्रभागा नदीत पवित्र स्नान केलं. महाराष्ट्रासह, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि इतर राज्यांतून सुमारे*

*आठ लाख भाविक पंढरपूरात दाखल झाले असून 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषानं परिसर दुमदुमला. )*

**<><><><><>**

हज यात्रेकरूंना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी नवी मुंबईमध्ये खारघर इथं नवीन हज हाऊस उभारण्याचं काम सुरु आहे. अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉ. चंद्रशेखर कुमार यांनी भारतीय हज समिती आणि केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह या ठिकाणी नुकतीच भेट दिली, आणि या प्रकल्पाच्या अंमलबजावणीचं वेळापत्रक आणि तांत्रिक बाबींवर चर्चा केली. नवीन हज हाऊस यात्रेकरूंच्या गरजा पूर्ण करेल, याची खात्री करण्यासाठी दळणवळण, लॉजिस्टिक्स आणि इतर सुविधांवरही यावेळी चर्चा झाली.

हज यात्रेशी संबंधित पायाभूत सुविधांचं आधुनिकीकरण आणि यात्रेकरूंना चांगल्या सुविधा पुरवण्याच्या दिशेनं अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय करत असलेल्या प्रयत्नांचा हा भाग आहे.

**<><><><><>**

६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं आज मुंबईत उद्घाटन होणार आहे. कोविड काळात खंड पडलेल्या या कार्यक्रमाला पुन्हा प्रारंभ होईल. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित अरुण कशाळकर उपस्थित राहणार आहेत. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार आणि प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांचं पथक आपली कला सादर करणार आहेत. येत्या २९ नोव्हेंबरपर्यंत देशभरातल्या २४ आकाशवाणी केंद्रांवर वेगवेगळ्या दिवशी हिंदुस्तानी, कर्नाटक शैलीतलं शास्त्रीय संगीत तसंच सुगम आणि लोकसंगीत अशा विविध परंपरांमधले कलाकार आपली कला सादर करणार आहेत.

**<><><><><>**

उद्योग आणि कौशल्य विकास क्षेत्रात महाराष्ट्राला आघाडीवर न्यायच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नाशिक आणि अमरावती या दोन जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक 'सी-ट्रिपल आयटी' केंद्र शासनानं मंजूर केलं आहे. या अंतर्गत, 'सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन,

इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग अर्थात, संशोधन, नवसंकल्पना आणि उद्योजकता वाढीला लावण्याकरता मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्र सुरु होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी टाटा टेक्नॉलॉजी कंपनीला पत्र लिहून अशा प्रकारची केंद्र सुरु करण्याविषयी सुचवलं होतं, त्याला कंपनीनं मान्यता दिली आहे. या केंद्रांमुळे युवकांना ‘एआय’, अर्थात, कृत्रिम बुद्धिमत्ता तसंच ‘रोबोटिक्स’, ‘इंटरनेट ऑफ थिंग्स’, ‘डेटा अनालिटिक्स, ‘इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञान’, ‘ऑटोमेशन’ या क्षेत्रांमधल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जागतिक दर्जाचं प्रशिक्षण मिळणार असून युवकांकरता स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

**<><><><><>**

आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी पक्षांतरबंदी टाळून सत्तेत सहभाग मिळवण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात तब्बल ३१ स्थानिक आघाड्या स्थापन झाल्या आहेत. या आघाड्यांची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातल्या जवळपास १२ नगरपालिका, नगरपरिषदा, ११ पंचायत समित्या, सोलापूर जिल्हा परिषद आणि सोलापूर महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका होऊ घातल्या आहेत. यामध्ये जवळपास ६०० ते ७०० पदाधिकाऱ्यांच्या निवडी निवडणूकीतून होणार आहेत.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याचा प्रचार शिगेला पोहोचला असून, रालोआ आणि महाआघाडी सह, विविध पक्षांचे स्टार प्रचारक आणि ज्येष्ठ नेते आपापल्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज भोजपुर आणि नवादा या जिल्ह्यांमधल्या प्रचार सभांना संबोधित करतील, आणि पाटणा इथं रोड शो करतील. ज्येष्ठ नेते अमित शहा यांची मुझफ्फरपूरमधे सभा झाली. महाआघाडी साठी काँग्रेस नेते राहुल गांधी बेगुसराय आणि खगरिया इथं निवडणूक प्रचारसभांना संबोधित करतील. महाआघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार तेजस्वी प्रसाद यादव आज विविध जिल्ह्यांमध्ये १७ सभा घेणार आहेत.

दरम्यान, पाटणा जिल्ह्यातल्या मोकामा मतदारसंघात हिंसाचाराच्या घटनांची नोंद झाली.

पहिल्या टप्प्यात १२२ मतदारसंघात येत्या गुरुवारी ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

<><><><><>

आयसीसी महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी अंतिम लढत आज नव्या मुंबईत डी वाय पाटिल मैदानात भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यात होत आहे. मात्र पावसामुळे खेळ अद्याप सुरु झालेला नाही.

<><><><><>

भारत-ऑस्ट्रेलिया टी ट्वेंटी क्रिकेट सपर्धेतला तिसरा सामना आज ऑस्ट्रेलियात होबार्ट इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या १७ षटकात ५ बाद १५६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

आशियाई युवा क्रीडास्पर्धांमधे चमकदार कामगिरी केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. या स्पर्धेत  १३ सुवर्णपदकांसह एकूण ४८ पदकं मिळवून भारत पदकतालिकेत ६व्या क्रमांकावर राहिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भारतीय संघाचं अभिनंदन करणारा संदेश समाजमाध्यमांवर लिहीला आहे.

<><><><><>

पुणे आणि नाशिक इथं आज झालेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातांमध्ये ४ जण ठार, तर ९ जण जखमी झाले आहेत.

पुण्यातल्या बंडगार्डन मेट्रो स्टेशननजिकच्या खांबाला गाडी आदळून झालेल्या अपघातात गाडीतल्या दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीररीत्या जखमी झाल्याचं समजतं.

नाशिकजवळ इगतपुरी इथं समृद्धी महामार्गावर एका टेम्पो ट्रॅव्हलरला झालेल्या अपघातात चालकासह आणखी एक जण जागीच ठार झाला.  अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले असून अन्य ८ जणांना किरकोळ दुखापत झाली.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. नुकसानाच्या पंचनाम्यांचं काम सुरूच आहे; मात्र गेल्या काही दिवसांपासून पाऊस वाढतच असल्याने अधिकाधिक क्षेत्र बाधित होत असल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे. आतापर्यंतच्या माहितीनुसार, जिल्ह्यातल्या ३२४ गावांमधल्या २४५२ शेतकऱ्यांना या पावसाचा मोठा फटका बसला असून, ४५२ हेक्टरहून अधिक क्षेत्रावरच्या शेतीचं नुकसान झालं आहे. भात आणि नाचणीच्या पिकाची वाताहत झाली असून पेंढाही भिजल्यामुळे जनावरांच्या वैरणीचाही तुटवडा भासणार आहे. पावसाळी वातावरणामुळे आंबा-काजूच्या मोहोरावर दुष्परिणाम झाला असून, पुढच्या हंगामातल्या शेतीचं नियोजनही कोलमडलं आहे.

दरम्यान, आज पावसाने विश्रांती घेतली असून, अनेक दिवसांनी सूर्यदर्शन झालं आहे.

**<><><><><>**

मोसमी पाऊस भारतीय उपखंडातून रवाना झाल्यानंतरही देशाच्या विविध भागात पाऊस होत आहे. अरबी समुद्रात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आता निवळला असल्याचं हवामान विभागाने सांगितलं. मात्र यंदाचा नोव्हेंबर महिना तुलनेने थंड असेल असा अंदाज आहे.

राज्यात काल पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात अनेक ठिकाणी पाऊस झाला. राजधानी मुंबईत आकाश ढगाळ आहे आणि अधून मधून पावसाच्या जोरदार सरी येत आहेत.

येत्या दोन दिवस संपूर्ण कोकणात काही ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**